# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10/12/2022 (शनिवार) दुपार

---

**अपघातात मृत्यु**

.१) **पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— अंतर्गत ०८ कि.मी. अंतरावरील सेजल बार समोर वर्धा रोड येथे दिनांक ०९/१२/२०२२ चे ११.४५ वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— विनोद अंबादास पहे, वय ५० वर्ष, रा. वडगाव, आर्वी रोड जि. यवतमाळ हे त्याचे वाहन क्र. MH २९ AD ८७५० ने त्यांची पत्नी व मुलगा हे यवतमाळ वरुन उमरेड ला जात असतांना मागून येणारा आरोपी ट्रक क्र. MH ४९ AT ५४७७ फिर्यादीचे कार ला जोरात धडक मारल्याने रोडच्या त्या बाजूला कार गेल्याने त्या जागी उभे असलेले ट्रॅक्टर समोर गाडी पडली आणि विरुध्द दिशेने येणारी स्प्लेंडर क्र. MH ३१ AY ८६५८ चा चालक मृतक नामे— संजय खापने हा ट्रॅक्टर च्या चाकात येवून जागीच मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ४२७, ३०४ (अ) भादवी. सहकलम १८४ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी हे करीत आहे.

२) **पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील गजानन लॉन दहेगांव रंगारी येथे दिनांक ०४/१२/२०२२ चे २१.४५ वा. ते २२.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— बबन संतोश राउत, वय ५९ वर्ष, रा. नविन बिना गुरुवार बाजार, खापरखेडा याचा मुलगा मृतक नामे— चंद्रशेखर बबन राऊत, वय ५९ वर्ष, रा. नविन बिना गुरुवार बाजार, खापरखेडा हा नमुद घटना वेळी व ठिकाणी गजानन लॉन दहेगांव रंगारी येथुन पायी रोड क्रॉस करीत असता कोणत्यातरी अज्ञात आरोपी मोटरसायकलचे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या मुलास जोरदार धडक देवुन अपघात केला व घटनास्थळावरून पळुन गेला जखमीस लाईफ लाईन, हॉस्पीटल येथे भर्ती केले असता त्यास आशा हॉस्पीटल, कामठी येथे रेफर केले तेथुन त्यास मेडीकल हॉस्पीटल, नागपूर येथे भरती केले असता उपचारादरम्यान वैदयकीय अधिकारी यांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन खापरखेडा येथे अज्ञात आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३८, ३०४ (अ), १३४ भादवी., सहकलम १८४ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक रेवतकर बं. नं १९८७ मो. नं. ९५४५५२३७३६ करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**